# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ०८-२३ दिनांक ०९/०१/२०२३

## वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणा-या दोन पुरुष आरोपीतास अटक करुन पिडीत महिलांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कामगिरी.

तुळींज पोलीस ठाण्याचे हद्दीत स्वागत लॉज, संतोषभवन, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर या ठिकाणी वेश्यागमनाकरीता महिला पुरविल्या जात असल्याची गोपनीय माहिती श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांना मिळाली होती. सदरच्या माहितीची खातरजमा करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे श्री संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक, यांना आदेश दिले होते.

प्राप्त माहितीच्या आधारे अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने दि.०७/०१/२०२३ रोजी सदर ठिकाणी बोगस गि-हाईक तयार करुन त्यास वेश्यादलाल याचेकडे संशईत वेटर नामे विशाल याचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केली असता संशईताने मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला, रुम भाडे व कमिशन असे एकुण ३५००/- रुपये लागतील असे बोगस गिऱ्हाईकास सांगितले. त्यांनतर पोलीस पथकाने दोन पंचासह सदर ठिकाणी छापा कारवाई करुन त्यामध्ये एक पुरुष दलाल आरोपी विशाल कूमार धनेश्वर पंडीत, वय २२ वर्षे व काउंटरवरील मॅनेजर नामे यल्लप्पा आंनद कुंचीपेरव, वय ४८ वर्षे यांस ताब्यात घेतले व दोन पिडीत महिलांची वेश्याव्यवसायापासुन सुटका केली आहे. सदर बाबत तुळींज पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं २२/२०२३ भादंविस कलम ३७०(१)(३), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून तपासादरम्यान आरोपीत याच्याकडुन मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने गुन्हयास मदत करणारे पाहीजे आरोपी १) जगदीश आण्णा २) राजु पुजारी ३) चिराग ४) शेखर आण्णा ५) स्वागत लॉजचे जागा मालक यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. संतोष चौधरी, पो.हवा. शेटये, शिंदे, म.पो.हवा. डोईफोडे, तिवले, चालक पागी सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा युनिट, पो.हवा. विनोद राउत नेम. सहा.पो.आयुक्त (गुन्हे शाखा) कार्यालय, म.पो.हवा. कामडी नेम. भरोसा सेल, वसई व अभिषेक कोरपे (सदस्य) रेस्क्यु फाउंडेशन पोईसर कांदीवली यांनी केली आहे.

---ooo---